महाराष्ट्र शासन

वित्त विभाग, दालन क्रमांक ३५७ (विस्तार इमारत),

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई-४०००३२.

दूरध्वनी क्रमांक-२२८४५२३०/ २२७९३८१५ Email ID-comp-fd@mah.gov.in


क्रमांक : सीओएम-२०२५/प्र. क्र.५२/संगणक कक्ष, दिनांक- ०५/१२/२००२५.

प्रति,

१. अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान), सा.प्र.वि., मंत्रालय, मुंबई.
३. सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त, राज्य कर, जीएसटी भवन, माझगांव, मुंबई.
५. विशेष आयुक्त, राज्य कर, जीएसटी भवन, माझगांव, मुंबई.
६. संचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, मुंबई.
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
८. उप सचिव (उद्योग-४), उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. उप सचिव (कराधान), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. उप सचिव (कोषा-प्रशा-४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. सह आयुक्त, राज्य कर, जीएसटी भवन, माझगांव, मुंबई.

विषय:- प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या ८७ व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय/ महोदया,

वित्त विभाग व वित्त विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयांकरिता संगणकीकरणविषयक प्रस्तावांवर निर्णय घेण्याकरिता प्रकल्प अंमलबजावणी समिती (P.I.C.) गठीत करण्यात आलेली आहे.

२. सदर समितीची ८७ वी बैठक मंगळवार, दि.०२ डिसेंबर, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग तथा अध्यक्ष, प्रकल्प अंमलबजावणी समिती यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

३. सदर बैठकीचे इतिवृत्त माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव सोबत जोडले आहे.

आपला,

(क.सि. बडगुजर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सह सचिव (संगणक कक्ष), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. निवडनस्ती (संगणक कक्ष).

## प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) ८७ व्या बैठकीचे इतिवृत्त.

वित्त विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची ८७ वी बैठक प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दि.०२/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. दालन क्रमांक ४०३, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई येथे पार पडली.

प्रस्तुत बैठकीस समितीचे पुढील सदस्य आणि संबंधित अधिकारी हजर होते.

१. डॉ.रिचा बागला, प्रधान सचिव (ले व को), वित्त विभाग तथा अध्यक्ष, प्रकल्प अंमलबजावणी समिती.
२. श्री.निखील कांबळे, डिएजी, महालेखापाल कार्यालय, मुंबई.
३. श्री.एम.आर.नारायणवाल, राज्यकर सह आयुक्त, आर्थिक बुद्धिसंपदा कक्ष, माझगांव, मुंबई.
४. श्रीम.दिपा देशपांडे, संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
५. श्रीमती मु.नि.धुरी, सह सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. श्रीम.स्वप्नजा सिंदकर, सह संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
७. श्रीम. भारती देशमुख, सह संचालक, लेखा व कोषागारे, पुणे.
८. श्री.देवराज म्हस्के, उपसंचालक (सं), लेखा व कोषागारे, मुंबई.
९. श्री.संजय कंधारे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. श्री.रवी लिंगनवाड, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. श्रीम. दिपा ठाकूर, उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. श्री.चंद्रशेखर ठाकुर,उपायुक्त, वस्तु व सेवा कर विभाग, मुंबई.
१३. श्री.रफिक मोहम्मद, वरिष्ठ संचालक (IT) राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, मंत्रालय, मुंबई.
१४. श्री.विजय पाटील, प्रकल्प संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय मुंबई.
१५. श्री.क.सि.बडगुजर, अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. श्रीमती रुपाली सावंत, अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. श्री.शशांक चव्हाण, कक्ष अधिकारी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. श्री.म.भ.भामरे, कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

बैठकीत खालील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यात आले.

**Agenda-1:**

**Request for Administrative and Financial Approval from PIC to deploy Four Technical Resource Positions (From MahaIT) currently deployed on the Performance Reporting and Information Support Environment (PRAISE) Project of MGSTD for a Period of Three Months (01 October, 2025 to 31st December, 2025) Resources may be replaced as per requirement, but Role will Remain Unchanged.**

JC, EIU, briefed the PIC and following points were discussed as below,

1. The PRAISE system (Performance Reporting and Analysis for Information Support in Environment) is an end-to-end officer workflow system that enables structured and



मु.नि.धुरी

standardized operations across GST administration. It now functions as the primary portal for all departmental officers, supporting the generation of all notices and orders within the system.

2. Following the launch of the PRAISE system on July 1, 2024, and in view of the increasing need for its continuous development and enhancement, four technical resources from Maharashtra Information Technology Corporation Ltd. (MahaIT) were onboarded with the requisite approvals from the Department and the Project Implementation Committee (PIC) in the 82nd PIC meeting dated 13th Sep 2024 and 84th PIC meeting dated 12th Mar 2025.
3. The PRAISE system is continuously evolving as a department's Front-End software acting as a support system for officers in their GST Administration. And it captures feedback from the officers on the distributed cases.
4. With this limited available resource, critical and need based approach is adopted for the development of functionalities. To ensure the uninterrupted operation of the PRAISE system and the continued development of new and evolving functionalities, the presence of the current four Senior Software Resources is deemed essential. These resources have consistently contributed to maintaining system stability, enhancing performance, and delivering timely technical upgrades.
5. The onboarding process involved a rigorous evaluation of multiple profiles and several rounds of interviews, ensuring that the selected candidates matched the department's technical competencies and functional requirements. These resources were engaged in a phased manner, as and when suitable candidates were selected and approved.
6. For the seamless functioning of the EIU department, it is imperative to keep the PRAISE system up and running and ensure that the development is continued with functionalities required by the GST administration. Therefore, as and when the validity of G.R. is extended the department may seek further Administrative and Financial approval for the required resources from the PIC for period beyond 30th December 2025.
7. The onboarding process was conducted under the "Man Month Rate", which adheres to industry-standard norms for technical staffing in government IT projects. As per Para No. 2 of the GR dated 27-09-2022 read with MahaIT circular dated 27-12-2024, the base rate has been increased by 8% effective from 01 October 2025. The reference to 8% rate revision as per Para No. 2 of the GR dated 27-09-2022 is reproduced as below:

*“परिशिष्ट 'ब' येथील दर दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत वैध राहतील, त्यानंतर निवेदेतील ५.९ (२ येथल तरतूदीनुसार या नंतरच्या प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला आधारभूत दरपत्रकामधील प्रत्येक पदनामाचा दर ८ टक्क्यांनी वाढवून सूधारीत करण्यात येतील आणि सदर दर त्या वर्षाचा आधारभूत दर गणला जाईल”*

8. *Considering above provision the revised rate per month for Senior Software Developer will be as below:

9. Revised Rate per Month = (Current Rate + 8%) =Rs.1, 65, 576/- + 8% = Rs.1, 65, 576/- × 1.08 = Rs.1, 78, 822/- (excluding applicable taxes). This revised rate will be applicable from October 1, 2025, and the total cost for four such resources over a three-month period will be calculated accordingly.

The technical resources will continue to support:

- API development for GSTR-2A, GSTR-3B, and ITC Ledger,
- Development and optimization of ad hoc APIs,
- Integration with third-party systems,
- Enhancements for data-driven decision-making and officer feedback,
- Visualization using Tableau and other tools.

10. In view of the above, MGSTD desires to deploy the 4 technical resources on demand basis for the PRAISE project. EIU has opted the method of "Man Month Rate" based technical project as per DIT GR dt. 27-09-2022 and MahaIT circular on dated 27th December 2024 for hiring the technical resources as the current scope of the project includes development and maintenance of above-mentioned functionalities.
11. The DIT G.R of GAD(IT) dated 27 Sep 2022 was valid for a period of 3 years up to 30th Sep 2025. As per the G.R. of GAD(IT) dated 3rd Oct 2025, the previous DIT G.R of GAD(IT) dated 27 Sep 2022 has been extended by three months, covering period from 1st Oct 2025 to 30th Dec 2025.
12. It was further clarified that the resources may be replaced based on availability and need, while roles and responsibilities remain unchanged. The final decision regarding deployment shall be taken by the Hon'ble Commissioner of State Tax, Maharashtra State.
13. The detailed chart of the required technical resources for the PRAISE Project along with their total cost for 3 months is as under.

**Table-1**

| Sr. No. | Resource Role | Type of Consultant | Man-Month Rates (Excluding GST@18%) as per MahaIT circular (till 30Sep2025) in Rs. | Man-Month Rates (Excluding GST@18%) as per MahaIT circular (from 01Oct2025) in Rs. | Man - Months | Total Cost (Excluding GST @ 18%) Rs. | Total Cost (Including GST @ 18%) Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| A | B | C | D | E=(D*1.08) | F | G=(E*3) | H=(G*1.18) |
| 1 | Front-End and Back-End Software Developer (PHP) | Senior Software Developer | 165576 | 178822 | 3 | 536466 | 633030 |
| 2 | Front-End and Back-End Software Developer (PHP) | Senior Software Developer | 165576 | 178822 | 3 | 536466 | 633030 |
| 3 | Front-End and Back-End Software Developer (PHP) | Senior Software Developer | 165576 | 178822 | 3 | 536466 | 633030 |
| 4 | Front-End and Back-End & API Software Developer (Java) | Senior Software Developer | 165576 | 178822 | 3 | 536466 | 633030 |
| | | TOTAL | 6,62,304 | 7,15,288 | | 21,45,864/- | 25,32,120/- |
| | ➢ 8% increase in Man-Month Rate from 1st Oct 2025 | | | | | | |
| | ➢ Amount in rupees: Twenty-one lakhs Forty-five thousand eight hundred and sixty-four only | | | | | | |

Hence, the following proposal was submitted by MGSTD, with approval of Commissioner of State Tax, for the approval of PIC.

**Proposal for consideration of PIC:**

It was requested to PIC that Administrative and Financial approval be granted for deployment of four Senior Software Developers from Maharashtra Information Technology Corporation Ltd. (MahaIT) for the PRAISE project for 3 months (three months) from 1st October 2025 to 30th Dec 2025, at the total cost of Rs. 21,45,864/- (Rupees Twenty-One Lakh Forty-Five Thousand Eight Hundred and Sixty-Four Only) excluding 18% GST, amounting to Rs. 25,32,120/- (Rupees Twenty-Five Lakh Thirty-Two Thousand One Hundred and Twenty Only) including 18% GST.

The engagement will be made as per MahaIT's circular dated 27th December 2024 and Government Resolution dated 3rd Oct 2025, and Government Resolution dated 27th September 2022 has been extended by 3 months, under the "Man Month Rate" with an 8% rate revision from 1st October 2025. The decision regarding replacement of resources and final deployment will rest with the Hon'ble Commissioner of State Tax, Maharashtra State.

**Discussion in PIC:**

As per the proposal from MGSTD, the Revised Rate per Month four Senior Software Developers for the period from 1st October 2025 to 30th Dec 2025 would be as per the proposal. But, as highlighted by representative of DIT/IT, the rates would be same as per MahaIT circular dated 27-12-2024.

**Decision of the PIC:**

PIC granted Administrative and Financial approval for deploying four Senior Software Developers from Maharashtra Information Technology Corporation Ltd. (MahaIT) for the PRAISE project for 3 months (three months) from 1st October 2025 to 30th Dec 2025, as per the rates of DIT GR dt. 27-09-2022 and MahaIT circular dated 27-12-2024.

**Agenda 2:**

**सन २०२६-२७ या वित्तीय वर्षामध्ये महालेखापाल नागपूर येथील लेखा कार्यालयाकरीता एक तसेच लेखा कार्यालय व निवृत्तीवेतन कार्यालय ऐकमेकांशी जोडणी करता एक अश्या 14 Mbps व 16 Mbps क्षमतेच्या दोन LEASE LINE सुविधा मे. भारत संचार निगम लि. नागपूर यांचेकडून उपलब्ध करुन घेण्यास व त्यासाठी होणारा खर्च रु.११,२३,५८२/- यास प्रकल्प अंमलबजावणी समिती तसेच प्रशासकीय मान्यता प्राप्त होणेबाबत.**

**प्रस्तावना:-**

महालेखापाल, नागपुर यांनी सादर केलेल्या मागणीच्या अनुषंगाने त्यांचे लेखा कार्यालयाकरीता ८ MBPS DEDICATED LEASE LINE तसेच लेखा कार्यालय व निवृत्तीवेतन कार्यालय एकमेकांशी जोडणीकरीता ८ MBPS POINT TO POINT DEDICATED LEASE LINE अश्या दोन DEDICATED LEASE LINE सुविधा उपलब्ध करून देणेकरीता. **क्र.अर्थसं-१०१३/प्र.क्र.३४/कोषा प्रशा-४,**

दि.१८.१०.२०१४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. दरवर्षी मे. भारत संचार निगम लि. नागपुर यांना सदर दोन्ही DEDICATED LEASE LINE चे आगाऊ प्रदान करण्यात येते.

महालेखापाल कार्यालयाद्वारे Online Reconciliation साठी विकसीत करण्यात आलेल्या Module मध्ये राज्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी Reconciliation बाबतची कार्यवाही पार पाडत असल्याने Online Reconciliation Module च्या कामाची व्याप्ती वाढल्याने तसेच Online Receipts Of Compiled Accounts चे काम वाढल्याने ८ MBPS Bandwidth मर्यादेच्या पुढे डेटा गेल्यास इंटरनेट चा वेग कमी पडू लागला सबब उपरोक्त नमूद दोन ८ MBPS DEDICATED LEASE LINE ची क्षमता १४ MBPS व १६ MBPS अश्या जास्त क्षमतेमध्ये वाढवून घेण्यास व त्यासाठी होणारा अपेक्षित खर्च रु.९,५२,१८८/- (अधिक कर) यास शासन वित्त विभाग यांचे **ज्ञापन क्र.संकिर्ण-२०१७/प्र.क्र.६७/कोषा प्रशा-४ दि.२७.१०.२०१७** अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

मागील वित्तिय वर्ष २०२४-२०२५ मध्ये प्रकल्प अंमलबजावणी समितीने दि.५.१२.२०२४ रोजीच्या ८३ व्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार व **शासन ज्ञापन क्र.संकिर्ण-२०१७/प्र.क्र.६७/कोषा प्रशा-४ दि.३०.१२.२०२४** अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार सन २०२४-२०२५ साठीचे प्रदान माहे मार्च २०२४ मध्ये मे. भारत संचार निगम लि. नागपुर यांना करण्यात आले आहे.

सन २०२६-२०२७ करीता महालेखापाल नागपूर येथील लेखा कार्यालयासाठी DEDICATED LEASE LINE तसेच लेखा कार्यालय व निवृत्तीवेतन कार्यालय एकमेकांशी जोडणीकरीता POINT TO POINT DEDICATED LEASE LINE अश्या १४ MBPS व १६ MBPS क्षमतेच्या दोन LEASE LINE ची मे. भारत संचार निगम लि. नागपुर यांची दोन बिजके सहसंचालक लेखा व कोषागारे, नागपुर यांनी त्यांच्या दि.२५.०८.२०२५ रोजीच्या क्र.संलेवको/संगणक/नागपुर AG lease line bill/२०९४/२०२५ च्या पत्रान्वये खालील तपशिलानुसार संचालनालयास मंजुरीस्तव सादर केली आहेत. सदर बिजकांचे प्रदान चालु वित्तिय वर्ष २०२५-२०२६ मध्ये करावयाचे आहे.

| SR. NO. | CUSTOMER ID | ACCOUNT NUMBER | INVOICE NUMBER | INVOICE DATE | LEASE CIRCUIT ID | BAND WIDTH | PERIOD | TOTAL AMOUNT PAYABEL (BILL AMOUNT + 18%GST) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7000175426 | 7000179499 | NDCMH 2500000001 | 12..08.2024 | 1000141690 | 16 MBPS | 01.04.2026 TO 31.03.2027 | 505312.99 + 90956.34 = 596269.33 |
| 2 | 7000175426 | 7000493297 | NDCMH 2500000002 | 12.08.2024 | 1000345261 | 14 MBPS | 01.04.2026 TO 31.03.2027 | 446875.01 + 80437.50 = 527312.51 |
| | | | | | | | TOTAL (1)+(2) | 952188.00 + 171393.84 = 1123581.84 |

**बैठकीच्या दरम्यान झालेली चर्चा:**

राज्य शासनाचे लेखापाल या भुमिकेतून राज्य शासनाच्या एकात्मिक वित्तिय व्यवस्थापन प्रणाली (IFMS) अंतर्गत विविध संगणकीय आज्ञावलींचे वापरकर्ता या नात्याने महालेखापाल नागपूर कार्यालयास उच्च क्षमतेची DEDICATED LEASE LINE ची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठीचा सेवा पुरवठादार मे.भारत संचार निगम लि. नागपुर हे भारत सरकारच्या मालकीचा एक सार्वजनिक उपक्रम आहे. प्रस्तुत सेवेसाठीचे दर हे मागील वर्षाचेच दर कायम आहेत. प्रस्तुत सेवा अनेक वर्षापासून सलगपणे घेण्यात येत आहे. तसेच महालेखापाल कार्यालयाने सदर सेवा समाधानकारक असल्याचे अवगत केले आहे. शासनाच्या एकात्मिक वित्तिय व्यवस्थापन प्रणालीच्या (IFMS) सुलभ व सुरक्षित कार्यान्वयनाच्या

दृष्टीकोनातून सदर सेवा अत्यावश्यक आहेत. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत प्रस्तावास मान्यता देणे आवश्यक आहे.

**समितीचा निर्णय:**

महालेखापाल नागपूर येथील लेखा कार्यालयाकरीता DEDICATED LEASE LINE तसेच लेखा कार्यालय व निवृत्तीवेतन कार्यालय एकमेकांशी जोडणीकरीता POINT TO POINT DEDICATED LEASE LINE अश्या 14 MBPS व 16 MBPS क्षमतेच्या दोन LEASE LINE सुविधा सन २०२६-२०२७ करीता मे.भारत संचार निगम लि. नागपुर यांचेकडून उपलब्ध करून घेण्यास व त्यासाठी होणारा खर्च रु.११,२३,५८२/-(करांसह) यांस मान्यता देण्यात आली.

**Agenda 3:**

**महालेखापाल, मुंबई व नागपूर कार्यालयातील निवृत्तीवेतनाच्या संबंधित नस्तींचे Digitization करणे व त्यासाठी होणारा खर्च त्या त्या वित्तीय वर्षाकरीता उपलब्ध अनुदानातून भागविणे यास प्रकल्प अंमलबजावणी समिती तसेच प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावना-:**

१. महालेखापाल, मुंबई कार्यालयातील निवृत्तीवेतनाच्या संबंधीत असलेल्या नस्तींचे (अंदाजे २.६२ कोटी पृष्ठांचे) डिजीटायझेशन M/s. Mathenson Records Management Pvt. Ltd, Mumbai या संस्थेकडून करुन घेणे व त्यासाठी होणारा खर्च रु.१,४७,००,०००/- यास दि.०४.०२.२०१९ रोजीच्या ३७ व्या बैठकीत प्रकल्प अंमलबजावणी समितीने मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सन २०१९-२०२० ते सन २०२४-२०२५ या वित्तिय वर्षात महालेखापाल मुंबई कार्यालयातील निवृत्तीवेतनाच्या संबंधीत नस्तींच्या डिजीटायझेशनसाठी एकुण रु.१,४६,९९,९९९.३४ (करांसहीत) इतका खर्च झालेला आहे (तपशिल खालील तक्त्यात नमूदप्रमाणे) म्हणजेच रु.१.४७ कोटी ही पुर्ण रक्कम खर्ची पडली आहे.

| DETAILS OF EXPENDITURE FOR DIGITIZATION AT AG-MUMBAI | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| TOTAL PROJECT COST Rs.1.47 CRORES | | | | | | | |
| GOVT APPROVED FOR Rs.1.47 CRORES ( PIC DT.04.02.2019 and DT.12.01.2022) | | | | | | | |
| 2019-2020 | 2020-2021 | 2021-2022 | 2022-2023 | 2023-2024 | 2024-2025 | TOTAL EXPENDITURE | BALANCE AMOUNT |
| 35,79,960.00 | 24,31,992.34 | 18,10,643.00 | 36,12,166.00 | 28,37,023.00 | 4,28,215.00 | 1,46,99,999.34 | NIL |

तदनंतर महालेखापाल, मुंबई कार्यालयाने त्यांच्या दि.२५/०८/२०२५ रोजीच्या ई-संदेश पत्रान्वये चालु आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये निवृत्तीवेतनाच्या संबधीत अंदाजे ५९.४९ लक्ष पृष्ठांचे डिजीटायझेशन करून घेण्यासाठी एकुण रू.५०.०० लक्ष (करांसहित) इतक्या अपेक्षित खर्चाची मागणी केली आहे.

२. महालेखापाल, नागपुर कार्यालयातील निवृत्तीवेतनाच्या संबंधीत असलेल्या नस्तींचे (अंदाजे ५.६४ कोटी पृष्ठांचे) डिजीटायझेशन M/s. Mathenson Records Management Pvt. Ltd, Mumbai या संस्थेकडून करुन घेणे व त्यासाठी होणारा खर्च रु.३,१०,००,०००/- यास दि.२५.०९.२०१९ रोजीच्या ४४ व्या बैठकीत प्रकल्प अंमलबजावणी समितीने मंजुरी दिलेली आहे. सदर डिजीटायझेशन काम टप्याटप्याने होणार असल्याने त्यानुसार पहिल्या टप्प्यामध्ये रु.७९.०० लक्ष, दुस-या टप्प्यामध्ये रु.७९.०० लक्ष, तिस-या टप्प्यामध्ये रु.७९.०० लक्ष व चौथ्या टप्प्यामध्ये उर्वरित रु.७३.०० लक्ष असे

एकुण रु.३,१०,००,०००/- इतकी रक्कम खर्च करण्यास शासन वित्त विभागाने मान्यता प्रदान केली होती. त्यानुसार सन २०१९-२०२० ते सन २०२४-२०२५ या वित्तिय वर्षांत महालेखापाल, नागपुर कार्यालयातील निवृत्तीवेतनाच्या संबंधीत नस्तींच्या डिजीटायझेशनसाठी एकुण रु.३,०९,९५,५६७ (करांसहीत) इतका खर्च झालेला असून त्यापैकी अखर्चित रक्कम रु.४,४३३/- इतकी आहे.

| DETAILS OF EXPENDITURE FOR DIGITIZATION AT AG-NAGPUR | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| TOTAL PROJECT COST Rs.3.10 CRORES | | | | | | | |
| 1) GOVT APPROVED Rs.79.00 LAKHS FOR 1st PHASE ( PIC DT.25.09.2019) | | | | | | | |
| 2) GOVT APPROVED Rs.79.00 LAKHS FOR 2nd PHASE ( GOVT SANCTION ORDER DT.17.10.2022) | | | | | | | |
| 3) GOVT APPROVED Rs.79.00 LAKHS FOR 3rd PHASE ( GOVT SANCTION ORDER DT.31.03.2024) | | | | | | | |
| 4) GOVT APPROVED Rs.73.00 LAKHS FOR 4th AND FINAL PHASE( GOVT SANCTION ORDER DT.31.01.2025) | | | | | | | |
| 2019-2020 | 2020-2021 | 2021-2022 | 2022-2023 | 2023-2024 | 2024-2025 | TOTAL EXPENDITURE | BALANCE AMOUNT |
| 28,91,000.00 | 25,00,000.00 | 18,32,316.00 | 43,10,660.00 | 1,21,61,591.00 | 73,00,000.00 | 3,09,95,567.00 | 4,433.00 |

तदनंतर महालेखापाल कार्यालय, मुंबई यांच्या दि.२४.०७.२०२५ रोजीच्या ई-संदेश पत्रान्वये ,चालु आर्थिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये तसेच महालेखापाल नागपुर यांनी अंदाजे एकुण ९१.५० लक्ष पृष्ठांचे डिजीटायझेशन करुन घेण्यासाठी वित्तिय वर्ष २०२५-२०२६ ते २०२७-२०२८ या तीन वर्षांकरीता एकुण ७३.४१ लक्ष (करांसहीत) (तपशिल खालीलप्रमाणे) इतक्या अपेक्षित खर्चाची मागणी केली आहे.

| अ.क्र. | कालावधी | एकुण पृष्ठे | अपेक्षित खर्च (करांसहीत) |
|---|---|---|---|
| १ | २०२५-२०२६ | २०.०० लक्ष | रु.१६,०४,८००/- |
| २ | २०२६-२०२७ | ४०.०० लक्ष | रु.३२,०९,६००/- |
| ३ | २०२७-२०२८ | ३१.५० लक्ष | रु.२५,२७,५६०/- |
| | एकुण | ९१.५० लक्ष | रु.७३,४१,९६०/- |

**बैठकीच्या दरम्यान झालेली चर्चा:**

महालेखापाल मुंबई व नागपुर कार्यालयातील सन १९६६-६७ ते सन २०२२-२०२३ या कालावधीतील निवृत्तीवेतनाच्या संबंधीत नस्तीं/अभिलेख्यांचे डिजीटायझेशनचे काम पुर्ण झालेले असून सन २०२३-२०२४ या कालावधीतील निवृत्तीवेतनाच्या संबंधीत नस्तीं/अभिलेख्यांचे डिजीटायझेशनची कार्यवाही सद्यस्थितीत प्रगतीपथावर आहे. महालेखापाल, मुंबई व नागपुर यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या सर्व जिल्हा कोषागार कार्यालयांसाठी e-PPO ही प्रणाली सन २०२३ व सन २०२४ मध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यापुढील कालावधीतील निवृत्तीवेतनसंबंधीत प्रकरणांच्या नोंदी व अभिलेख्यांचा डाटा ऑनलाईन पध्दतीने तयार होत आहे त्यामुळे महालेखापाल, मुंबई व नागपूर कार्यालयांतील निवृत्तीवेतनाच्या संबंधीत नस्तीं/अभिलेख्यांचे डिजीटायझेशनचे काम सन २०२३-२०२४ पर्यंतच मर्यादित असणार आहे. महालेखापाल कार्यालयाने चर्चेदरम्यान नमूद केल्यानुसार विहीत कार्यपद्धतीचे अनुपालन करून डिजीटायझेशन करण्यात येत आहे. तसेच सेवा पुरवठादारांच्या सेवा समाधानकारक आहेत. चालु वित्तिय वर्ष २०२५-२०२६ मध्ये डिजीटायझेशनच्या कामासाठी होणारा खर्च भागविण्यासाठी महालेखापाल, मुंबई यांना रक्कम रु.५०.०० लक्ष तसेच महालेखापाल, नागपुर यांना २०२५-२०२६ ते २०२७-२०२८ या तीन वित्तिय वर्षांकरीता एकुण रक्कम रु.७३.४१ लक्ष इतक्या अनुदानाची आवश्यकता आहे. त्यानुसार महालेखापाल, मुंबई येथिल निवृत्तीवेतनाच्या संबंधीत नस्तीं/अभिलेख्यांचे अंदाजे ५९.४९ लक्ष पृष्ठांचे डिजीटायझेशन करणे व त्यासाठी होणारा खर्च रु.५०.००

लक्ष (करांसहीत) व महालेखापाल, नागपुर यांना त्यांच्या प्रस्तावित मागणीपैकी फ़क्त वित्तिय वर्ष २०२५-२०२६ मध्ये निवृत्तीवेतनाच्या संबंधीत नस्तीं/अभिलेख्यांचे अंदाजे एकुण २०.०० लक्ष पृष्ठांचे डिजीटायझेशन करणे व त्यासाठी होणारा एकुण खर्च रु.१६,०४,८००/-(करांसहीत) यास वित्तिय वर्ष २०२५-२०२६ करीता उपलब्ध होणा-या अनुदानातून भागविता येईल. मागणी केलेल्या अनुदानाची रक्कम ही मुळ मंजुर कराराच्या रक्कमेपेक्षा अधिक असल्याने सदर वाढीव रक्कमेकरीता नव्याने मान्यता प्राप्त होणे आवश्यक आहे.

**समितीचा निर्णय:**

१. महालेखापाल ,मुंबई येथील निवृत्तीवेतनाच्या संबंधीत नस्तीं/अभिलेख्यांचे अंदाजे ५९.४९ लक्ष पृष्ठांचे डिजीटायझेशन करण्यासाठी व त्यासाठी होणारा खर्च रु.५०.०० लक्ष (करांसहीत) इतक्या रकमेस सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षातील उपलब्ध अनुदानातून भागविण्यास मान्यता देण्यात आली.

२. सन २०२५-२०२६ या वर्षामध्ये महालेखापाल नागपुर येथील निवृत्तीवेतनाच्या संबंधीत नस्तीं/अभिलेख्यांचे अंदाजे एकुण २०.०० लक्ष पृष्ठांचे डिजीटायझेशन करण्यासाठी व त्यासाठी होणारा एकुण खर्च रु.१६,०४,८००/- (करांसहित ) इतक्या होणा-या परिगणीत रकमेस २०२५-२०२६ या आर्थिक वर्षातील उपलब्ध अनुदानातून भागविण्यास मान्यता देण्यात आली.

**Agenda 4:**

सन २०२५-२६ या वित्तीय वर्षामध्ये विभागीय सह संचालक, लेखा व कोषागारे,पुणे विभाग यांचे कार्यालय व जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे यांचेसाठी मे.भारत संचार निगम लि.(BSNL) यांचे कडुन 300 Mbps internet Leased Line (ILL) on Optical Fibre Cable (OFC) Media घेण्यास व त्यावरील पहिल्या वर्षी होणारा खर्च रु.११,२१,०००/- (करांसहीत) इतक्या खर्च रकमेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना:-**

Internet Leased Line ही सुविधा संबंधित ग्राहकांसाठी सर्वस्वी समर्पित (Exclusively Dedicated) असल्याने सदर सेवा ही जलदगती असून त्यात Band Width मध्ये चढ उतार होत नाही. सदर सुविधेत अन्य ग्राहकांचा समावेश नसतो. परिणामी सदर सुविधेमध्ये Data Theft किंवा Cyber Threats चे प्रसंग उद्भवत नाहीत. तसेच सदर सुविधेमध्ये ग्राहकाला Firewall Server स्थापित करता येतो ज्यामुळे माहितीची सुरक्षितता व गोपनियता राखली जाते. कोषागाराच्या Online वित्तिय व्यवहारांसाठी व कामकाजासाठी ही आवश्यक बाब आहे. त्याचप्रमाणे Internet Leased Line चा वेग हा Symmetrical असल्याने File Download आणि Upload करताना गती सारखीच राहते.

सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.टीईएल-१०११/प्र.क्र.१०४/(निवास-१)/२२ दि.१०.०४.२०२४ अन्वये कॉपर आधारीत दुरध्वनी सेवा ऑप्टीकल फ़ायबर लाईनमध्ये रुपांतरीत करून घेण्याबाबत सुचित केले आहे. सदर ऑप्टीकल फ़ायबर लाईनचे फ़ायदे पुढीलप्रमाणे आहेत.

१. ऑप्टीकल फायबर लाईन अद्ययावत अशा तंत्रज्ञानावर आधारित आहे.
२. फायबर लाईनवर इंटरनेट सेवा अत्यंत वेगवान व कमी त्रुटीयुक्त आहे.
३. दुरध्वनी सेवा खंडीत झाल्यास तक्रारीचे कमी कालावधीत निवारण होते.
४. फायबर लाईनवर STD व लोकल कॉलींग सेवा मोफत आहे.

उपरोक्त बाबी तसेच विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग यांचे कार्यालय व जिल्हा कोषागार कार्यालय पुणे यांचे कामकाजाचे स्वरुप विचारात घेऊन विभागीय सह संचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांनी मे.भारत संचार निगम लि. (BSNL) यांचेकडून दरपत्रक मागविले होते. प्राप्त दरपत्रकानुसार मे.भारत संचार निगम लि.(BSNL) यांनी सादर केलेल्या दरांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| Description | Price | Price | Price |
|---|---|---|---|
| Bandwidth | Standard ILL | Standard ILL | Standard ILL |
| | 100Mbps(1:1) (RJ45) | 200Mbps(1:1) (RJ45) | 300Mbps(1:1) (RJ45) |
| Advance i4nitial charges for the first year charges (in Rs.) i.e., Annual charges for bandwidth | 4,20,000/- | 6,90,000/- | 9,50,000/- |
| Installation charges | 0 | 0 | 0 |
| G.S.T. @18% (at actual) | 75,600/- | 1,24,200/- | 1,71,000/- |
| Total charges per year (in Rs.) | 4,95,600/- | 8,14,200/- | 11,21,000/- |
| BSNL has waived off the Installation charges of Rs.30,000/- + GST as special case. | | | |

वरील दरपत्रकानूसार विभागीय सह संचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग यांचे कार्यालय व जिल्हा कोषागार कार्यालय पुणे यांचेसाठी मे.भारत संचार निगम लि.(BSNL)यांचेकडून ३०० Mbps Internet Leased Line (ILL) on Optical Fibre Cable (OFC) Media घेण्यासाठी पहिल्या वर्षी होणारा अपेक्षित खर्च पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव व कामाचा तपशिल | मे.भारत संचार निगम लि.(BSNL) पुणे यांचे अंदाजपत्रकीय दर रक्कम (रु.) (करांसहीत) | आधुनिकीकरणांतर्गत एकुण अंदाजपत्रक रक्कम (रु.) (करांसहीत) |
|---|---|---|---|
| १. | विभागीय सहसंचालक,लेखा व कोषागारे,पुणे विभाग यांचे कार्यालय व जिल्हा कोषागार कार्यालय पुणे यांचेसाठी Internet Leased Line (ILL) providing Dedicated Internet 300 Mbps on OFC Media (Annual Charges for Bandwidth) | ११,२१,०००/- | ११,२१,०००/- |
| | | एकुण | ११,२१,०००/- |

मे.भारत संचार निगम लि.(BSNL) यांनी एक विशेष बाब म्हणून Intallation Charges रु.३०,०००/- आणि त्यावरील GST माफ केला असून तसेच उपरोक्त दर हे तीन वर्षासाठी एकच राहणार आहेत म्हणजेच त्यात वाढ होणार नाही.

**बैठकीच्या दरम्यान झालेली चर्चा:**

सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.टीईएल-१०११/प्र.क्र.१०४/(निवास-१)/२२ दि.१०.०४.२०२४ अन्वये कॉपर आधारीत दुरध्वनी सेवा ऑप्टीकल फ़ायबर लाईनमध्ये रुपांतरीत करून घेण्याबाबत सुचित केले आहे. सदर ऑप्टीकल फायबर लाईन अद्ययावत अशा तंत्रज्ञानावर आधारित आहे, फायबर लाईनवर इंटरनेट सेवा अत्यंत वेगवान व कमी त्रुटीयुक्त आहे, दुरध्वनी सेवा खंडीत झाल्यास तक्रारीचे कमी कालावधीत निवारण होते, फायबर लाईनवर STD व लोकल कॉलींग सेवा मोफत आहे. त्याचप्रमाणे Internet Leased Line ही सुविधा संबंधित ग्राहकांसाठी सर्वस्वी समर्पित (Exclusively Dedicated) असल्याने सदर सेवा ही जलदगती असून त्यात Band Width मध्ये चढ उतार

होत नाही. सदर सुविधेत अन्य ग्राहकांचा समावेश नसतो परीणामी सदर सुविधेमध्ये Data Theft किंवा Cyber Threats चे प्रसंग उद्भवत नाहीत. तसेच सदर सुविधेमध्ये ग्राहकाला Firewall Server स्थापित करता येतो ज्यामुळे माहितीची सुरक्षितता व गोपनियता राखली जाते. कोषागाराच्या Online वित्तिय व्यवहारांसाठी व कामकाजासाठी ही आवश्यक बाब आहे. त्याचप्रमाणे Internet Leased Line चा वेग हा Symmetrical असल्याने File Download आणि Upload करताना गती सारखीच राहते. सबब, प्रस्तावास मान्यता प्राप्त होणे आवश्यक आहे.

**समितीचा निर्णय:-**

विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग यांचे कार्यालय व जिल्हा कोषागार कार्यालय पुणे यांचेसाठी मे.भारत संचार निगम लि.(BSNL) यांचेकडून ३०० Mbps Internet Leased Line (ILL) on Optical Fibre Cable (OFC) Media घेण्यास व त्यासाठी पहिल्या वर्षी होणारा रु.११,२१,०००/-(करांसहीत) हा सन २०२५-२०२६ या वित्तिय वर्षाकरीता उपलब्ध होणा-या अनुदानातून भागविणे यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

सदरचे इतिवृत्त मा.प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), तथा अध्यक्ष,प्रकल्प अंमलबजावणी समिती यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

मुनिधुरी

(मु.नि.धुरी)
**सह सचिव, तथा सदस्य सचिव**
**प्रकल्प अंमलबजावणी समिती.**